जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली
दिनांक : 19/01/2011

# जाहीर प्रगटन
## जिल्हा सेतु समिती

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - 2005 अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी हिंगोली जिल्हयामध्ये प्रत्येक तालुक्यासाठी एक (APO Co ordination) व जिल्हा मुख्यालयासाठी एक (APO Monitoring) या प्रमाणे एकूण **सहा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी** यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपात जिल्हा सेतु समिती मार्फत करावयाची आहे. त्यासाठी पात्र व्यक्तींची नामनिर्देशने जिल्हा सेतु समिती मार्फत मागविण्यात येत आहेत. प्राप्त झालेल्या अर्जातुन उमेदवारांची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

तसेच मग्रारोहयो अंतर्गत निधीच्या किमान 50 % रक्कमेची कामे ग्राम पंचायतीमार्फत करावयाची आहेत. ग्रामपंचायतींना तांत्रीक सहाय्य करण्यासाठी सक्षम अनुभवी **पॅनल तांत्रीक अधिकारी** यांची कंत्राटी स्वरुपात स्थापत्य अभियंत्यांकडून तसेच कृषी अभियांत्रीकी पदविका धारक , कृषी पदविधारक आणी वनक्षेत्रातील पदवीधारक यांचेकडुन जिल्हा सेतु समिती हिंगोली याद्वारे अर्ज मागवित आहे. प्राप्त झालेल्या अर्जातुन उमेदवारांची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

**कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी पात्रता :-**

1) उमेदवार किमान MBA, MSW किंवा पदव्युत्तर पदवीधारक असावा, 2) उमेदवारास कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. 3) उमेदवार MS-CIT उत्तीर्ण असावा त्यास संगणक हाताळणीचे/इंटरनेट हाताळणीचे पुरेसे ज्ञान असावे. 4) तो कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नसावा.

**पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी पात्रता :-**

1) उमेदवार हा स्थापत्य अभियांत्रीक पदविकाधारक/कृषी अभियांत्रीक पदविकाधारक/कृषी पदविधारक/ वन क्षेत्रातील पदवीधारक असावा.

2) उमेदवारास कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. 3) उमेदवार MS-CIT उत्तीर्ण असावा त्यास संगणक हाताळणीचे/इंटरनेट हाताळणीचे पुरेसे ज्ञान असावे. 4) तो कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नसावा.

**दोन्ही पदांसाठी कामाचा कालावधी :-** उमेदवाराचा कामाचा कालावधी 11 महिने राहील. काम समाधान कारक असल्यास पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल. व काम असमाधानकारक असल्यास कोणत्याही वेळी उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखुन ठेवले आहेत.

**कामाचे स्वरुप :-**

सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आणी पॅनल तांत्रीक अधिकारी यांचे कामाचे स्वरुपाबाबत माहिती हिंगोली जिल्हयाची वेबसाईट www.hingoli.nic.in या वेबसाईटवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोलीचे रोहयो शाखेत पहावयास मिळेल.

**सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी उमेदवाराचे मानधन -**रु.10000 + रु.1000 (प्रवास व मोबाईल फोन खर्च) असे एकूण रु.11,000/- प्रतिमाह

**पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी उमेदवाराचे मानधन** - रु.9000/- + रु.1000/-(प्रवास खर्च व मोबाईल फोन खर्चासाठी) असे एकुण रु.10,000/- मानधन देण्यात येईल.

**अर्ज सादर करण्याची पध्दती -** 1) अर्ज पांढऱ्या A-4 आकाराच्या कागदावर संगणीकृत करुन **अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली** यांचे नावे सादर करावा लागेल. (अर्जामध्ये उमेदवाराचे नाव, उमेदवाराचा संपूर्ण पत्ता, संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक, शैक्षणीक पात्रता, ज्या तालुक्यात काम करण्यास इच्छुक आहेत त्या तालुक्याचे नाव, उमेदवाराचे वय, लिंग व कामाचे पुर्व अनुभवाचा तपशील इत्यादी बाबीचा समावेश असावा) 2) अर्जासोबत शैक्षणीक पात्रता व अनुभवाबाबतच्या कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणाव्यात व साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्या लागतील याची नोंद घ्यावी.

**सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी अर्ज सादर करावयाचा दिनांक** - सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदासाठी अर्ज दिनांक 29/01/2011 रोजी सकाळी 10 ते 12 या कालावधीत सादर करावेत. त्याच दिवशी दुपारी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी अर्ज सादर करावयाचा दिनांक** - पॅनल तांत्रीक अधिकारी पदासाठी अर्ज दिनांक 31/01/2011 रोजी सकाळी 10 ते 12 या कालावधीत सादर करावेत. त्याच दिवशी दुपारी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. अपरीहार्य कारणास्तव मुलाखती नियोजीत दिवशी घेणे शक्य नसल्यास तशी सुचना उमेदवारांना अर्ज सादर करण्याचे दिवशी देण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा सेतु समिती हिंगोली**